# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

---

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/३८३/सन २०२६-२७ दिनांक: ०६.०५.२०२६

**EXPRESSION OF INTEREST (EOI)**

**MHD/EOI-१/२०२६**

विषय: पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना व बालकांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत रक्त पुरवठा व रक्त संक्रमण करणेस रक्तपेढीकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविणेबाबत.

ग्रा.रू. / उ.जि.रु. / जि.रु. / स्त्री.रु./ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालये व मनपा क्षेत्रातील मॅटर्निटी होम / हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालये येथे सिझेरियन शस्त्रक्रिये दरम्यान व प्रसुति संदर्भात होणाऱ्या गुंतागुंतीचे उपचारासाठी, गर्भपात तसेच मातांना इतर शस्त्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या उपचाराकरीता तसेच ० ते १ वर्ष बालकांकरिता रक्तसंक्रमणाची आवश्यकता भासते.

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत २६ आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. सद्यस्थितीत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये वार्षिक १९१०६ ANC असुन त्यामधुन साधारण ७६७२ High Risk ANC / Anemia - ३८२ आहेत. या High Risk गरोदर माताना गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार रक्त पुरवठा करणे गरजेचे असते. तसेच बालकांना Anemia च्या आजारामध्ये रक्त संक्रमण करावे लागत असते. पनवेल महानगरपालिकेकडे स्वत:चे रुग्णालय व रक्तपेढी नाही. त्यामुळे अशा High Risk गरोदर मातांना व Anemia बालकांना पालिकेमार्फत रक्त पुरवठा करणेकरिता अडचणी येत आहेत.

याकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार High Risk गरोदर मातांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत पालिका स्तरावरुन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय क्षेत्रामधील गरोदर मातांना रक्तपुरवठा उपलब्ध करून द्यावयाचा असल्याने रक्तपेढी (Blood Bank) हि त्याच पालिका क्षेत्रात असणे आवश्यक आहे. याकरिता निश्चित केलेल्या सेवा शर्ती खालीलप्रमाणे:

१. पुरवठादार संस्थेची FDA कडे नोंदणी आवश्यक आहे.
२. मालक/संचालक/व्यवस्थापक यांचे नाव, पत्ते व संपर्क क्रंमाक सादर करणे.
३. रक्तपेढी ही सुसज्ज व FDA च्या मानांकानुसार असावी.
४. रक्तपेढी पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातर्गत असावी.

५. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संदर्भित केलेल्या रुग्णांस आवश्यकतेनुसार (२४ X ७) रक्तपुरवठा (कंपनेंट / प्लेटलेट / प्लाझमा / होल बल्ड) करावयाचा आहे.

६. शासनाने Whole Blood / Packed Red Cell करिता शासकीय रक्तकेंद्रासाठी रु. ११००/- व अशासकीय रक्त केंद्रासाठी रु. १५५०/- तसेच Fresh Frozen Plasma / Platelet Concetrate करिता शासकीय रक्तकेंद्राकरिता रु. ३००/- व अशासकीय रक्तकेंद्राकरिता रु. ४००/- असा दर निश्चित केलेला आहे.

७. एक वर्षाकरिता करारनामा (MOU) करण्यात येईल.

८. पुरवठादाराचे एक वर्षातील पुरवठा समाधानकारक असल्यास पुढील एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येईल.

रक्तपुरवठा सेवा पुरविण्यास इच्छूक असलेल्या रक्तपेढींनी वरील सेवा शर्तीची पुर्तता करून दोन लिफाफे पध्दतीत (Technical and Commercial) होकारपत्र व दरपत्रक सिलबंद पाकीटात दिनांक १८.०५.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वैद्यकिय आरोग्य विभाग, पनवेल महानगरपालिका, मुख्यालय, पनवेल येथे स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) सादर करावे.

**(प्रसेनजीत कारलेकर)**
**उपायुक्त (वैद्यकीय)**
**पनवेल महानगरपालिका**